जा.क्र.का.15/विहिर/मूल्यांकन/परिपत्रक/ 539
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि.27 /05/2016.

**परिपत्रक :-**

**विषय** :- विहिरीसाठी खरेदी-विक्री होणा-या जागेचे मूल्यांकनाबाबत.

विहिर / कुपनलिका असलेल्या शेतजमिनींचे मूल्यांकन कसे करावे ? याबाबत विभागाकडील दि.2 मे 2006 रोजीच्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गत करण्यात आल्या आहेत.

नदीलगत / ओढयालगत / तलावालगत, विहिरीसाठी / पाणी पुरवठयाची सोय करण्यासाठी कमी क्षेत्राच्या जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारामध्ये मूल्यांकन कशाप्रकारे करावे, याबाबत नोंदणी विभागाकडील अधिका-यांकरिता आयोजित करण्यात आलेल्या दि.20 व 21 मे 2016 रोजीच्या उजळणी प्रशिक्षण शिबिरात, याबाबत विचारणा करण्यात आली होती. वार्षिक मूल्य दर तक्त्यासोबतच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनामध्ये, अशा प्रकारच्या जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारामध्ये कशाप्रकारे मूल्यांकन करावे याबाबत स्पष्टता नाही. सबब मूल्यांकनात एकवाक्यता रहावी म्हणून खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करणे आवश्यक झाले आहे.

नदी / ओढा / तलावाच्या कडेला विहिरीसाठी जेव्हा जमिनीची खरेदी होते तेव्हा, त्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता असते म्हणूनच जमीन घेतली जाते. त्यामुळे अशा जमिनीचे मूल्यांकन बारमाही बागायत म्हणून जिरायत दराच्या दुप्पट दराने करण्यात यावे. मात्र, विहिरीसाठीचे व्यवहार हे 10 आर पेक्षा कमी क्षेत्राचे असल्यास उर्वरीत महाराष्ट्रासाठी लागू मार्गदर्शक सूचना मधील सूचना क्रमांक 21 (अ) नुसार पुन्हा उपरोक्त मूल्याच्या दिडपट दराने मूल्यांकन करणे आवश्यक राहील.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन.)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-
1) मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
3) मा.महालेखापाल (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

4) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
5) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/ नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
10) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता